वाचले

1) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५ (१)
2) आदेश क्र.नासुके/१/कावि/७०५/२०१३ दि.०६/११/२०१३
3) स्थापत्य विभागाकडील दि.२०/०३/२०१७ चा प्रस्ताव.

---

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा
अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुके/१/कावि/९५ /२०१७
दिनांक : १२ /०४/२०१७

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
जन माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करणेबाबत...
(स्थापत्य विभाग)

आदेश

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (१) व १९ (१) मधील तरतूदीनुसार वाचले क्र.२ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विविध विभागांसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यात आलेले आहेत. स्थापत्य मुख्य कार्यालयासाठी तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालये (स्थापत्य) साठी जन माहिती अधिकारी म्हणून संबंधित कार्यकारी अभियंता यांना आणि प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून शहर अभियंता यांना पदनिर्देशित करणेत आले आहे.

स्थापत्य विभागाकडील जादा प्रमाणात माहिती अधिकार अर्ज प्राप्त होत असलेने व येणाऱ्या अर्जांवर जलद गतीने कार्यवाही होणेचे दृष्टीने वाचले क्र.३ चे स्थापत्य विभागाच्या कार्यालयीन प्रस्तावान्वये स्थापत्य विभागाने जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यामध्ये बदल सुचविलेले आहेत. त्यानुसार संबंधित कार्यकारी अभियंता यांचे ऐवजी संबंधित उपअभियंता अ,ब,क,ड,ई,फ स्थापत्य क्षेत्रीय कार्यालये व स्थापत्य मुख्य कार्यालय यांना जनमाहिती अधिकारी म्हणून व संबंधित कार्यकारी अभियंता अ,ब,क,ड,ई,फ स्थापत्य क्षेत्रीय कार्यालये व स्थापत्य मुख्य कार्यालय यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेबाबत कळविले आहे.

सबब, स्थापत्य विभागाकडील माहिती अधिकार विषयक कामकाज जलदगतीने पार पाडावे व नागरिकांना माहिती शिघ्रतेने उपलब्ध व्हावी या उद्देशासाठी आणि अधिनियमातील तरतूदी या बाबी विचारात घेऊन, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, संबंधित उपअभियंता, अ,ब,क,ड,ई,फ स्थापत्य क्षेत्रीय कार्यालये व स्थापत्य मुख्य कार्यालय यांना जनमाहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता, अ,ब,क,ड,ई,फ स्थापत्य क्षेत्रीय कार्यालये व स्थापत्य मुख्य कार्यालय यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

संबंधित अधिकारी यांची प्रशासकीय बदली झाल्यास / पद रिक्त असल्यास, बदली झालेल्या किंवा अतिरिक्त पदभार सोपविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी त्या पदास पदनिर्देशित केल्याप्रमाणे कामकाज करावे. कामकाज बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे पद रिक्त राहिल्यास विभागप्रमुख, स्थापत्य यांनी माहितीच्या अधिकाराची व्यवस्थित अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना व कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

(दिनेश वाघमारे)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / संबंधित अधिकारी,
मुख्य कार्यालय स्थापत्य विभाग,
अ,ब,क,ड,ई,फ क्षेत्रीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत,

माहिती व तंत्रज्ञान विभाग.

२/- प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने मनपा वेबपोर्टलवरील माहिती अद्ययावत करावी.

प्रशासन अधिकारी,
नागरी सुविधा केंद्र
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.